निर्मल ग्राम !! सुंदर गांव !!!



# गट ग्राम पंचायत वेळा (हरिश्चंद्र)



पंचायत समिती नागपूर, ता.जि. नागपुर.

सरपंच श्री. सचिन कृष्णराव इंगळे | उपसरपंच श्री. प्रभाकर बापुराव काळबांडे | सचिव श्री. सी.पि. मुंगले



सदस्य गण

आकाश ज्ञानेश्वर पिसार

❖

सौ. ...ठी सतिश सेलकर

❖

सौ. कविता पिंटु ठाकरे

❖

सौ. शालिनी राजू थुल

❖

माधुरी पुरुषोत्तम बोधनकर

❖

... छत्रपाल पाटील


जा. क्र. :

दिनांक :

(शिक्का: गट ग्रा. पं. वेळा (हरिश्चंद्र) आ./जा. ६० दि. ७/७/२०२१ पं.स.त.जि. नागपूर)

प्रती,

शर्मा कन्स्ट्रक्शन कंपनी तर्फे
रितेश राधेश्याम शर्मा
रा.पोस्ट ऑफिस रोड गोकुळपेठ
नागपूर -१०

विषय: मौजा वेळा हरी ख.क्र. १४१/५ मधील मंजूर रहिवासी ले आऊट अभिन्यास हस्तांतरित करण्याबाबत.

संदर्भ: १) शर्मा कन्स्ट्रक्शन कंपनी तर्फे श्री रितेश राधेश्याम शर्मा यांचा दिनांक ०१/०४/२०२१ रोजीचा अर्ज.
२) मा. कार्यकारी अभियंता (मेट्रो) विभाग सदर नागपुर व मा. सहायक अधिकारी (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना ग्रा. पं. चे पत्र जा. क्र. २६ दिनांक ०२/०६/२०२१ अन्वये.
३) मा.सहायक अभियंता-१ (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र. सहा. अभि.(द) / ना.म.प्र.वि.प्रा. ५१३ दिनांक १७/०६/२०२१ अन्वये.

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये कळविण्यात येते की आपल्या अर्जानुसार व मा. सहायक अभियंता-१ (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र.सहा. अभि.(द) / ना.म.प्र.वि.प्रा. ५१३ दिनांक १७/०६/२०२१ रोजीचे पत्रानुसार मौजा वेळा हरी ख.क्र. १४१/५ आराजी १६२००.०० चौ. मीटर (१.६२ हे.आर) क्षेत्रफळात शर्मा कन्स्ट्रक्शन कंपनी तर्फे श्री रितेश राधेश्याम शर्मा यांनी अभिन्यासातील विकास करारनामा मधील अट क्र. १७ नुसार विकासकाने मलवाहिका, पर्जन्यवाहिका , पिण्याचे पाण्याची वाहिनी , सीमेंट कॉंक्रीट रस्ते , खुल्या जागेस सुरक्षा भिंतीचे बांधकाम व मल –जल शुद्धीकरण संयंत्राचे बांधकाम मंजूर विकास नकाशानुसार पूर्ण केलेले आहे असे पत्रात नमूद आहे. वरील विकास कामे अर्जदाराने पूर्ण केल्यामुळे व ना. म. प्र. वि. प्रा. विभागीय कार्यालय-१ दक्षिण यांचे पत्राचे आधीन राहून सदर विकास कामाची देखभाल व दुरुस्ती यापुढे ग्रा.पं. करण्यास तयार आहे. पण तत्पूर्वी पूर्ण भूखंडावर कर आकारणी करून देण्याची जबाबदारी अर्जदार / ले आऊट मालकाची राहील. जोपर्यंत प्लॉटधारकाचे नावाने टॅक्स लागत नाही तोपर्यंत ले आऊट धारकाचेच नावाने टॅक्स राहील व ले आऊट धारकानांच यासमोर टॅक्स भरणा करावा लागेल. व भविष्यात सर्व प्लॉटधारकाचे टॅक्स लावून देणे लेआऊट धारकावर बंधनकारक राहील तसेच ले आऊट मध्ये मोक्यावर पूर्ण वसाहत तयार होईपर्यन्त व लेआऊट मालक यांनी सादर केलेल्या १०० रुपयेचा मुद्रांक नंबर YN ११६१२१ दिनांक २५/०६/२०२१ चा खरेदी दिनांक २८/०६/२०२१ चा स्टॅम्प पेपरवर लिहून दिलेल्या हमीपत्रात नमूद बाबीची देखभाल व दुरूस्ती ले आऊट मालकाची राहील. तसेच ना. म. प्र. वि. प्रा. यांचे पत्रात नमूद बाबी व्यतिरिक्त इतर बाबी आढळल्यास व भविष्यात वाद निर्माण झाल्यास ती सोडविण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित अर्जदार / ले आऊट धारक यांची राहील. ग्राम पंचायतची जबाबदारी राहणार नाही.

वरील अटी व शर्तींच्या आधीन राहून व विविध शासकीय विभागाच्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ग्राम पंचायत सदर लेआऊट अभिन्यास हस्तांतरित करण्यास तयार आहे.

करिता सविनय महितीस सादर.

दिनांक : ०३/०७/२०२१

(स्वाक्षरी)
सरपंच
गट ग्रा. पं. वेळा (हरिश्चंद्र)